**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** माळशिरस

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0010 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/01/2025 02:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 07/01/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/01/2025

**Time From (वेळेपासून):** 17:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/01/2025 **Time (वेळ):** 02:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/01/2025 02:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जुन्या तहसिल कार्यालयातील , गार्डरूम येथे,माळशिरस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेश भानुदास सरगर
(b) **Father's Name** (वडील चे नाव) : भानुदास सरगर
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कचरेवाडी, ,माळशिरस,माळशिरस ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कचरेवाडी, ,माळशिरस,माळशिरस ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9922918195

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तात्रय बळीराम थोरात | | वडील का नाम : बळीराम थोरात | 1. विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या , वर, पहिला मजला, रूम नं2, माळशिरस,माळशिरस,माळशिरस ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.08.01.2025

मी सुरेश भानुदास सरगर, वय- 36 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. मु.पो कचरेवाडी, ता.माळशिरस, जि.सोलापूर मो.नं. 9922918195 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहणेस असून शेती व्यवसायावर माझी व कुंटुबाची उपजिविका करतो. दि. 28/12/2024 रोजी माझे चुलत भाऊ बाजीराव सोपान सरगर, भाऊजय अनिता सरगर, पुतण्या कुणाल सरगर व पत्नी प्रणाली सरगर यांच्यासोबत भांडण झाल्याने मी माळशिरस पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्यावरुन त्यांच्याविरुध्द गुन्हा रजिस्टर नंबर 584/2024 भारतीय न्याय सहिंता कलम 118(1),115(2),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. माझी भाऊजय अनिता बाजीराव सरगर यांनी आमच्याविरुध्द क्रास कंम्लेंट दिल्याने माझ्यावर तसेच माझा भाऊ प्रशांत सरगर, माझी पत्नी रोहिणी सरगर व इतर असे आमच्याविरुध्द गुन्हा रजिस्टर नंबर 583/2024 भारतीय न्याय सहिंता कलम 118(1),115(2),189(1),189(2),191(1),191(2) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. वरील दोन्ही गुन्हे तपासाकरीता पोलीस हवालदार दत्तात्रय बळीराम थोरात यांच्याकडे आहेत. आमच्याविरुध्द दाखल गुन्हयात माझा भाऊ प्रशांत भानुदास सरगर व मला दि.01/01/2025 रोजी पोलीस हवालदार थोरात यांनी अटक करुन दि.02/01/2025 रोजी कोर्टात हजर केल्यानंतर आम्हाला कोर्टातून जामीन मिळाले होते.

त्यानंतर दि.04/01/2025 मला पोलीस हवालदार थोरात यांनी फोन करून जुन्या तहसिल कार्यालयातील लॉकअप गार्डरुम येथे बोलावून घेतले. त्यावरून मी त्यांची भेट घेतली असता त्यांनी मला जामिनसाठी वकीलाला किती रुपये दिले होते असे विचारले त्यावर मी त्यांना वकीलाला 5000/- रुपये दिल्याचे सांगितले असता त्यांनी मला तुझ्याविरुध्द दाखल गुन्हयात चार्जशिट पाठवण्यासाठी मदत करतो, त्यासाठी रु 10,000/- दे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सदर गुन्हयात मला व माझ्या भावाला अटक झाली असून कोर्टातून जामिन झाले आता काय राहिले असे सांगितले असता त्यांनी माझी पत्नी रोहिणी ही पण आरोपी आहे तिला अटक करतो असे सांगून मला भिती दाखविली. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे नंतर देतो असे सांगून निघून आलो.

त्यानंतर आज दि.07/01/2025 रोजी सकाळी 9.30 वाजेच्या सुमारास मी माझ्या मुलांना क्लासला सोडून येत असताना जैन मंदिरच्या जवळ पोलीस हवालदार थोरात यांची भेट झाली, त्यावेळी त्यांनी मला रु.10,000/- कधी देता असे विचारले, त्यावेळी मी दुपारी येवुन भेटतो असे त्यांना सांगितले. पोलीस हवलदार दत्तात्रय थोरात हे आमच्याविरुध्द दाखल गुन्हयात माझी पत्नी रोहिणी हिस अटक करण्याची धमकी देवून, दाखल गुन्हयाचे चार्जशिटमध्ये मदत करण्यासाठी रु.10,000/- लाचेची मागणी करत असल्याने मी आज दि.07/01/2025 रोजी दुपारी अडिच वाजेच्या सुमारास अॅन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांना फोन करून संपर्क साधला व माझी तक्रार सांगितली. त्यानंतर लगेच पोलीस हवालदार थोरात यांचा मला कॉल आला व त्यांनी भेटण्यास येण्यासाठी सांगितले, त्यावेळी मी त्यांना पाहुण्याकडे जावून संध्याकाळी येतो असे सांगितले.

त्यानंतर आज दि.07/01/2025 रोजी पोनि पिंगुवाले व त्यांचे पथक माळशिरस पालखी तळ येथे येऊन माझी भेट घेतली. सदरवेळी मी पोनि पिंगुवाले व त्यांच्या सोबत आलेल्या दोन शासकीय पंचासमक्ष पोलीस हवालदार दत्तात्रय थोरात हे आमच्याविरुध्द दाखल गुन्हयात माझी पत्नी रोहिणी हिस अटक करण्याची धमकी देवून, दाखल गुन्हयाचे चार्जशिटमध्ये मदत करण्यासाठी रु.10,000/- लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार पोनि पिंगुवाले व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याच्या उद्देशाने पोनि पिंगुवाले यांनी मला पोलीस हवालदार थोरात यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, ते जुन्या तहसिल कार्यालयातील लॉकअप



Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

गार्डरुम येथे असतात पण दुपारी त्यांचा कॉल आला तेव्हा ते अकलुज येथे जावून येणार असल्याचे सांगितले होते असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर पोलीस हवालदार थोरात साहेब यांनी मला आजरोजी भेटायला बोलावले असल्याने त्यांना फोन करून भेटायला येत असलेबाबत सांगुन ते कुठे आहेत असे विचारण्यास सांगितले. त्यावेळी मी पोलीस हवालदार थोरात साहेबांना त्यांचे 9359586720 यावर फोन करून स्पीकर चालू ठेवला त्यावेळी मी त्यांना थोरात साहेब अकलुजवरुन आला का असे विचारले असता त्यांनी हा आलो असे सांगून गार्डात आहे असे सांगितले. सदरचे संभाषण पोनि पिंगुवाले यांनी रेकॉर्ड करून घेतले. त्यानंतर सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून झिंगरे व पंच क्र.2 म्हणून फाटके असे काम करायचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पोलीस हवलदार थोरात साहेब यांची पडताळणी करण्यासाठी भेट घेण्यास सागून पंच क्र.01 झिंगरे व मला सर्व आवश्यक सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून 17.32 वा चे सुमारास माझ्याकडील मोटार सायकल क्र. ग्क 45 ऋक्र 1927 यावरुन रवाना केले. मी व पंच क्र.1 झिंगरे असे जुन्या तहसिल कार्यालयातील लॉकअप गार्डरुम येथे जावून पोलीस हवालदार थोरात यांची भेट घेतली असता पोलीस हवालदार थोरात व पोलीस कॉन्स्टेबल अडत हे गार्डरुममध्ये काम करत बसले होते. त्यावेळी मी पोलीस हवालदार थोरात यांच्यासोबत चर्चा करत असताना चर्चेदरम्यान पो. ह. थोरात यांनी पंचाबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझे मेव्हणे असल्याचे सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान त्यांनी गुन्हयाबाबत बर त्या दिवशी साक्षीदार तुमच्या गावातन घेतलीत..येवढी घेतलीत चार बास का? येवढी बास का चारच हायत.. असे सांगितले. त्यावर मी त्यांना कशाला लय वाढवायची चारच बस असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील चौकशीकरीता असलेल्या अर्जाबाबत व इतर चर्चा केली. चर्चेदरम्यान पो. हवा थोरात यांनी उजव्या हाताच्या इशा-याने दोन वेळा पाच पाच असा इशारा करून दहा हजार रुपयांची मागणी केली. त्यावर मी लय होतेत..तुम्हीच सांगा व्यवस्थित काय असे विचारलो असता त्यांनी त्यांच्याकडील चौकशीसाठी असलेल्या अर्जाबाबत शिवाकडून किती पैसे घेतले माहित आहे का असे विचारणा केली. त्यानंतर चर्चेदरम्यान मी त्यांना तुम्ही सांगा.. असे सांगितले. त्यांनी मला मी म्हणलो की तुला..असे बोलले.. तेव्हा मी दहा लय होतेत..तुम्ही सांगा एक आकडा..असे विचारलो असता बरोबर बोललो मी.. असे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी कस हाय काम तर झालय तुमच्या देखत..ही चार्जशीटच फक्त राहिलय..ती तर काम होवून गेलय..असे म्हणून काम झाल्याचे सांगितले, चर्चेदरम्यान पोलीस हवा. थोरात यांनी दरवेळसच हाय तुझ..तुला सहकार्य करतो मी त्यात काय वाद नाही असे सांगितले. त्यावेळी मी व्यवस्थित सांगा तुमी.. असे बोलून लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी कुठ लय बोललो मी..लय तोंड वासल मी अस नाय असे सांगितले. तेव्हा मी कस होतय माझ्या म्हणण्यानी दहा जरा जास्तच होतय..माझ्यासाठी ओ एवढी बार..एवढीबार माझ ऐका की असे सांगितले असता त्यांनी रागात काय नाही..तुला खर सांगु का..नाय दिल तरबी चालतय..नाय दिल तरी चालतय..मला हाजाच खर्च कितीय.कागद.. असे बोलले. त्यावेळी मी त्यांना माझ्यासाठी थोडफार करा की..पुढच्या वेळेला करू की.. असे सांगितले असता, पोलीस हवा थोरात यांनी दोन कमी दे.. असे बोलून दहा हजारातून दोन कमी करून रु. 8000/- लाचेची मागणी केली, त्यांनतर मी त्यांना दोन कमी. आठ.. येवू का जावून.. अशी विचारणा केली असता, त्यांनी ये की.. असे बोलून लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांना इथेच आहे का तुम्ही असे विचारले असता त्यांनी इथच हाय.. असे सांगितले. त्यानंतर पोलीस हवा थोरात यांनी हीकड बघ तुझ्या लोकांना सहकार्य मी करणार.. त्याज्याकडून कोण आल तर त्यांना बी सहकार्य करणार..तुला हे बी मी शब्द देतो.. कारण कसय.. मला सगळी सारखीच हायत.. असे बोलून मला मदत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी आठ देतो तुम्हाला...आपल्या दोघात रहाव..नायतर परत असे सांगितले असता त्यांनी कुणाला बोलू नको.. असे मला सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.01 तिथून परत सापळा पथक थांबलेल्या पालकी तळ या ठिकाणी येवून भेट घेतली आणि घडलेली हकिकत सांगितली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी पंच क्र.01 झिंगरे व मला घडलेली हकिकत विचारून घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंचाने सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले आणि सदर पडताळणी कारवाईदरम्यान पोलीस हवालदार थोरात यांनी 8000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलीस निरीक्षक पिंगुवाले साहेबांनी पोलीस हवालदार थोरात यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देवुन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या एकूण 16 नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या समोरील बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक पिंगुवाले साहेबांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून 18.17 वा



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

मला व पंच क्र. 1 झिंगरे यांना पोलीस हवालदार थोरात यांना भेटायला माझ्याकडील मोटार सायकल क्र. म्क 45 ऋक्र 1927 यावरुन रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पथक व पंच क्र. 2 यांच्यासह सरकारी वाहनाने आमच्या मागोमाग येवून बस स्टँडच्या अलिकडे शासकिय वाहन थांबवून ते पायी चालत येवून जुन्या तहसिल कार्यालयाच्या बाहेरील बाजूस कोणास संशय येणार नाही अशारितीने सापळा लावून थांबले. मी व पंच क्र. 1 असे गार्डरुमच्या आतमध्ये गेलो असता, गार्डरुम बंद होते, त्यावेळी मी पोलीस हवालदार यांना फोन करुन कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी पोलीस स्टेशनला असून तिकडे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशनला गेलो असता त्यांनी प्रथम थोडा वेळ थांबण्यास सांगितले, नंतर त्यांनी जुन्या तहसिल कार्यालयाचे गार्डरुमजवळ जावून थांबण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 असे परत गार्डरुम जवळ येवून थांबलो असता, थोडयावेळाने ते गार्डरुम येथे आले. त्यावेळी पो हवा थोरात यांनी मला तुला काय टेन्शन नाय ना असे बोलले असता मी त्यांना विचारुन कशाचं.. असे विचारले असता थोरात यांनी हा ह्ाज..(असे म्हणुन हाताच्या इशा-याने लाच रक्कमेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारली) त्यावेळी मी त्यांना मापून घ्या.. आठ हजार रुपये हायत.. असे सांगितले असता त्यांनी नक्की का.. तुला टेन्शन हाय का..मी तुला मागीतले का असे मला बोलले. त्यानंतर मी चेक करा आणि खिशात ठेवा..आपल बघा तेवढं असे सागितले असता, पोलीस हवा थोरात यांनी इथल बघतो मी..तुला सहकार्य शंभर टक्के असे बोलुन मला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यांनतर मी ठरल्याप्रमाणे माझे मो.क्र.9922918195 वरुन पोनि पिंगुवाले यांचे मो.क्र.9067891014 वर मिस्ड कॉल करुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी जुन्या तहसिल कार्यालयाचे बाहेरील बाजुस थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोलीस हवालदार यांना ताब्यात घेवून नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव दत्तात्रय बळीराम थोरात, पद- पोलीस हवालदार बं.नं. 506, नेम- माळशिरस पोलीस स्टेशन, रा.विदर्भ-कोकण ग्रामीण बँकेच्यावर, पहिला मजला, रुम नं. 2, माळशिरस ता. माळशिरस जि. सोलापूर असे असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस हवालदार थोरात यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंच क्र.2 यांनी पोनि पिंगुवाले यांच्या सूचनेप्रमाणे ताब्यात घेतल्यानंतर गार्डरुमची पंचासमक्ष तपासणी करुन सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पोलीस हवालदार थोरात यांना ताब्यात घेवून सापळा कारवाईबाबत श्री नारायण पवार पोलीस निरीक्षक, माळशिरस पोलीस ठाणे यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही विश्रामगृह, माळशिरस सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि.07/01/2025 रोजी 17.32 ते 18.17 वा चे दरम्यान लोकसेवक दत्तात्रय बळीराम थोरात वय-56 वर्षे, पद- पोलीस हवालदार बं.नं. 506, नेम- माळशिरस पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, राहणार- विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या वर, पहिला मजला, रुम नं.2, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी जुन्या तहसिल कार्यालयातील गार्डरुम येथे माझ्याविरुध्द दाखल गुन्हयाचे चार्जशिटमध्ये मदत करण्यासाठी स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन रु.10,000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.8000/- लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची पिंरट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Narayan Vinayakrao Pawar (I (Inspector)) / DGPNVPM7401 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

सु. भा. सरगर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature] ठाणे अमलदार ... पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Narayan Vinayakra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPNVPM7401



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner